महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५७

# महाराजा सयाजीराव आणि यशवंतराव चव्हाण

दिनेश पाटील



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५७

# महाराजा सयाजीराव
# आणि
# यशवंतराव चव्हाण

दिनेश पाटील

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि यशवंतराव चव्हाण
इतिहास
दिनेश पाटील
●
प्रकाशन क्रमांक - ७७
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : दिनेश पाटील
प्लॉट ११४, सत्यवती कॉलनी,
जाखले-वारणानगर
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११३
९६२३८५८१०४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३४ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

| | |
|---|---|
| **दिनेश पाटील** | **बाबा भांड** |
| संपादक | सचिव |
| **महाराजा सयाजीराव** | **महाराजा सयाजीराव गायकवाड** |
| **ज्ञानमाला ई बुक प्रकल्प** | **सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद** |

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# यशवंतराव चव्हाण

यशवंतराव चव्हाण १९५६ ला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले त्या घटनेला आज ६४ वर्षे पूर्ण झाली. परंतु आजही महाराष्ट्र 'यशवंतरावां'चा पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जातो. यशवंतरावांनी स्वातंत्र्योत्तर भारतात 'अनेक क्षेत्रात सर्जनशील उपक्रम सुरू करून महाराष्ट्राला अनेक सकारात्मक कामांचा पाया घालणारे राज्य' ही ओळख मिळवून दिली. यशवंतराव हे वैश्विक चिंतन करणारे, सतत वाचन करणारे, संतुलित विचार करणारे, राज्याच्या आणि देशाच्या चौफेर विकासाचा विचार करणारे नेते होते. अत्यंत सामान्य परिस्थितीतून पुढे येऊन स्वतःची जागतिक प्रतिमा तयार करणारे नेते होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीदिवशी नागपूरच्या तरुण भारतचे संपादक माडखोलकर यांनी 'हे राज्य मराठीचे की मराठ्यांचे होणार' असा फार धूर्त आणि खोचक प्रश्न विचारून यशवंतरावांवर ब्राह्मणी 'अंकुश' ठेवण्याचा सूचक प्रयत्न केला. यानंतर लक्ष्मणशास्त्री जोशी हे यशवंतरावांचे गुरू आहेत

असे ठसविण्याचा प्रयत्न ब्राह्मण बुद्धिजीवींनी केला. म्हणूनच यशवंतरावांनी अत्यंत शांतपणे स्वतःच स्पष्टपणे नोंदवून ठेवले आहे की, 'माझा कोणी गुरू नाही'.

लक्ष्मणशास्त्रींच्या लादलेल्या गुरुत्वाबरोबर यशवंतरावांच्या सर्वसमावेशक धोरणाला 'बेरजेचे राजकारण' या नकारात्मक आणि संकुचित संकल्पनेत स्थिर करण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे १९९० नंतरच्या फुले - शाहू – आंबेडकर या पुरोगामी प्रारूपाला अधिष्ठित करण्यासाठी याअगोदर ३० वर्षे यशवंतरावांनी विकसित केलेल्या भक्कम पायाभूत धोरणाकडे आपल्या अभ्यासकांनी पुरेशा गांभीर्याने पाहिले नाही. यशवंतरावांचे हे पुरोगामित्व जात आणि धर्ममुक्त होते. म्हणूनच ते सयाजीरावांच्या धोरणाशी तंतोतंत जुळणारेसुद्धा होते.

'फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र' हे वैचारिक प्रारूप साधारणतः १९९० नंतर महाराष्ट्राचे वैचारिक अधिष्ठान म्हणून जास्त प्रभावशाली ठरू लागले. याला मंडल आयोगाच्या अंमलबजावणीच्या राजकारणाची पार्श्वभूमी होती. भारतीय लोकशाहीतील जातकेंद्री मतपेटीचे अपरिहार्य राजकारण या प्रारूपात प्रबळ ठरले आणि त्यातील पुरोगामित्व भाषणाच्या चौकटीत बंदिस्त झाले. या प्रारूपाचे वैचारिक सत्त्व महाराष्ट्राने पुरेशा गांभीर्याने घेतले नाही. असाच काहीसा प्रकार याअगोदर शिवाजी महाराजांच्या वैचारिक वारशाबाबतही घडण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. याचा परिणाम २००० सालानंतर

अधिक टोकदार झाला. शिवाजी महाराज आणि शाहू महाराज मराठा 'आयकॉन' झाले. तर आंबेडकर दलितांचे नेते म्हणत म्हणत त्यांच्या जातीचे आयकॉन झाले. ओ.बी.सींचे नाव घेत फुले माळी जातीचे आयकॉन म्हणून ताब्यात ठेवण्याचा अट्टाहास बळावला. परिणामी शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या आत्मसन्मानाचा विचार मांडणारे फुले अधिक आकुंचित होत गेले.

या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांचे जात्यंतक चळवळीला असणारे योगदान आपण विचारात घेतले नाही. महात्मा फुलेंची परंपरा पुढे नेणारे शाहू-आंबेडकर आणि शिवाजी महाराजांची परंपरा यांच्यातील समान धागे जोडण्याची भक्कम संधी आपण गमावली. या सर्व महापुरुषांनी 'समतेची पंढरी' म्हणून घडवलेल्या सुपीक भूमीचे आपण स्वप्रयत्नाने 'क्षारपड' भूमीत रूपांतर केले. परिणामी महाराष्ट्र आज जात आणि धर्माधारित द्वेषाची 'सुपीक' भूमी म्हणून उदयाला येत आहे. आज जरी आपल्याला हे गंभीर वाटत नसले तरी नजीकच्या २-४ वर्षांत याचे जीवघेणे भीषण परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहेत. गेल्या ६० वर्षांत महाराष्ट्रात पुरोगामित्वाचा वसा घेऊन झालेल्या संशोधन-लेखनात या सर्वांची बीजे आपल्याला सापडतात. 'डीकास्ट' झालेल्या महापुरुषांना जेव्हा कॉ. शरद पाटलांसारखे काही अपवाद वगळता जाती अभिमानी,

आत्मकेंद्री आणि संकुचित संशोधक-अभ्यासक भेटतात तेव्हा यापेक्षा वेगळा परिणाम होत नाही. सर्वांत अगोदर यावर स्वतंत्र संशोधन होण्याची गरज आहे.

कारण १ मे १९६० ला ज्यावेळी यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राची निर्मिती झाली तेव्हा आधुनिक महाराष्ट्राचे स्वप्न महाराष्ट्राने पाहिले होते. यशवंतराव चव्हाणांनी निसंदिग्धपणे शिवरायांचे 'सुराज्य' साकारण्याचा संकल्प सोडला होता. परंतु १७ व्या शतकातील शिवाजी महाराजांचे सुराज्य २० व्या शतकात साकारण्याचे प्रारूप मात्र १९ व्या शतकात सयाजीरावांनी बडोद्यात तयार केले होते. त्यामुळे हे सुराज्य सयाजीरावांमार्फत यशवंतरावांकडे आले होते. याकडे महाराष्ट्रातील एकाही अभ्यासक-संशोधकाचे लक्ष का गेले नाही? हा प्रश्न आज उपस्थित होत आहे. या दृष्टीने यशवंत'नीती'तील सयाजी'विचार' शोधल्याशिवाय आपल्या सामाजिक जीवनाला आलेली सूज कमी करता येणार नाही.

यशवंतराव चव्हाणांच्या कालखंडातील सर्व निर्णय आणि सयाजीरावांच्या ५८ वर्षांच्या कारकिर्दीतील सर्व कार्यक्रम यांची तुलना केली तर महाराष्ट्राला धक्का बसेल अशी साम्यस्थळे आढळतात. हा अपघातही नव्हता आणि योगायोगही नव्हता. तर यशवंतरावांमधील 'तत्त्वज्ञ' आणि 'देशीवादी' प्रशासकाने अतिशय समंजसपणे सयाजीरावांचा वारसा कोणतेही ढोल न वाजवता जनकल्याणाच्या प्रामाणिक ध्यासातून पुढे नेला

होता. शिवरायांचे सुराज्याचे धोरण काळानुरूप विकसित करून सयाजीरावांनी शिवरायांचे 'सर्वोत्तम' वारसदार ही आपली प्रतिमा इतिहासात निर्माण केली.

यशवंतरावांनी सयाजीविचार आपल्या धोरणात 'मुरवून' सयाजीरावांचे प्रामाणिक, वैचारिक आणि कृतिशील वारसदार म्हणून इतिहासात आपले स्थान निर्माण केले आहे. यशवंतरावांवर स्थानिक संदर्भापासून आंतरराष्ट्रीय तुलनेपर्यंत संशोधन करणारे सर्व अभ्यासक या वारशापासून अनभिज्ञ आहेत. यशवंतरावांचे राजकीय वारसदार शरद पवार यांनी १९८६ मध्ये निंबाजीराव पवार यांच्या 'जेव्हा गुराखी राजा होतो' या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात केलेले भाषण महाराष्ट्राने 'आत्मटीके'साठी चिंतन करावे असे आहे. या भाषणात त्यांनी मांडलेली भूमिका त्यांचे राजकीय गुरू यशवंतरावांनी आपल्या धोरण आणि कृतीतून रुजवले असल्याचा पुरावा मिळतो. त्याची चर्चा आपण पुढे वेगवेगळ्या संदर्भात केली आहे. हे चिंतन महाराष्ट्राच्या जडणघडणीत सयाजीरावांच्या थेट योगदानाबरोबरच वैचारिक वारशाच्या अंगानेही करणे महाराष्ट्राला आता टाळता येणार नाही.

यशवंतरावांचे सासरे सयाजीराव महाराजांच्या खासगी खात्यात महत्त्वाचे अधिकारी होते. बडोद्यातील संस्कार वेणूताईंच्या माध्यमातून यशवंतरावांकडे आले होते. यशवंतरावांचे भाऊ सत्यशोधक चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते

होते. स्वातंत्र्यलढ्याच्या कालखंडात मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारधारेबद्दलही यशवंतरावांना आस्था होती. परंतु सर्व विचारधारांचा आदर करणारे यशवंतराव कोणत्याही विचारधारेच्या आहारी गेले नाहीत. याबाबत ते सयाजीरावांचे 'वैचारिक नातेवाईक' ठरतात. कारण सयाजीरावांनी सर्व विचारधारांचे लोक आपल्या प्रशासनात घेतले. परस्परविरोधी विचारधारांशी संवाद ठेवला परंतु कोणत्याही विचारधारेचा शिक्का आपल्यावर बसू दिला नाही. धोरण मात्र क्रांतिकारक पद्धतीने पुरोगामी ठेवले.

## शेती

सयाजीरावांनी आपले लहान बंधू संपतराव यांच्याबरोबर खासेराव जाधवांना १८८४ मध्ये कृषीविषयक उच्चशिक्षणासाठी इंग्लंडला पाठवले. खासेरावांनी ऑक्सफर्डच्या कृषी महाविद्यालयात कृषीविषयक पदवी घेतली. १८९० मध्ये खासेराव बडोद्याला परतले. सयाजीरावांनी १८९७ ला खासेरावांच्याच नेतृत्वाखाली बडोद्यातील कृषी खात्याची स्थापना केली. खासेरावांच्या नेतृत्वाखाली शेतीसाठी पाणी, अवजारे, प्रगत ज्ञान सातत्याने शेतकऱ्यांना दिले. महाराजांनी 'कृषीकर्मविद्या' हा ६०० पानांचा ग्रंथ १८९६ मध्ये प्रकाशित केला. विद्यार्थ्यांना प्रगत शेती आणि पूरक कौशल्य प्रशिक्षणाची सोय केली.

संस्थानातील 'मॉडेल फार्मस्' आदिवासी निवासी शाळांना संलग्न करून आदिवासी विद्यार्थ्यांना शेतीचे आधुनिक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था सयाजीरावांनी केली. सहकारी पतपेढ्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थकलेल्या कर्जफेडीसाठी व शेतीची अवजारे घेण्यासाठी भारतात सर्वांत कमी दराने कर्ज उपलब्ध करून दिले. संस्थानाच्या प्रायोगिक शेतीकेंद्रांना शेतकऱ्यांच्या भेटी आयोजित करून त्यांना प्रगत शेतीचे प्रशिक्षण दिले. शेती प्रदर्शनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून दिली. शेती आणि उद्योग यांच्यात परस्पर पूरकता जोपासण्याच्या उद्देशाने १९३८ मध्ये कृषी औद्योगिक संस्थेची स्थापना करण्यात आली.

१ मे १९५६ ते १९ नोव्हेंबर १९६२ अशी सहा वर्षे यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. परंतु महाराष्ट्राच्या राजकारणावरील त्यांचा प्रभाव साधारणपणे पुढील २ दशके टिकून होता. १९६० ला महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीबरोबर यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली 'कृषी-औद्योगिक समाजरचने'ची संकल्पना अवलंबली गेली. या संकल्पनेने ग्रामीण महाराष्ट्रात आर्थिक क्रांती घडवली. यशवंतराव चव्हाण यांनी कृषीविषयक सुधारणा करताना शेतीच्या मालकी हक्काचा प्रश्न, भूमिहीनांचा प्रश्न व कृषी विकासासाठीच्या पायाभूत सुविधांची उभारणी यावर अधिक भर दिला. यशवंतरावांनी सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून शेतीचा विचार केला.

भारतीय कृषी क्षेत्रांसंदर्भात आपले विचार मांडताना यशवंतराव म्हणतात, 'भारतात शेती क्षेत्रात भूमिहीनांची संख्या अधिक आहे. म्हणून वाजवीपेक्षा अधिक जमिनी असणाऱ्या लोकांनी त्यांच्या जमिनीच्या एक ते दोन टक्के जमीन त्यांना द्यावी. तसेच जमीन अविकसित असल्याने ती अनुत्पादक व पडीक राहिली आहे. अशा जमिनी लागवडीखाली आणणे आवश्यक आहे. शेती व्यापारी तत्त्वाने केली पाहिजे. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर केले पाहिजेत. नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला पाहिजे. नद्यांवर धरणे बांधली पाहिजेत. धरणे बांधल्याने विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन केले पाहिजे. शेतकऱ्यांनी कृषिशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे.' यशवंतरावांचे हे विचार सयाजीरावांचे कृषीविषयक विचार आणि धोरणांची आठवण करून देणारे आहेत.

कोयना व उजनी ह्या महाराष्ट्रातील प्रमुख जलप्रकल्पांच्या उभारणीसाठी यशवंतरावांनी विशेष प्रयत्न केले. मूलभूत सुविधांच्या विकासासाठी कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या बांधणीवर विशेष भर दिला. १ एप्रिल १९५७ रोजी यशवंतरावांनी 'कसेल त्याची जमीन' धोरणानुसार कुळांना जमीनमालक म्हणून घोषित केले. पुढे १९६० च्या दशकात यशवंतरावांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात विविध कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. आजचा प्रगत ग्रामीण महाराष्ट्र विचारात घेतला तर कृषी-औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या शेतीमाल

प्रक्रिया उद्योगांमध्ये साखर, सूतगिरणी आणि दुध उद्योग यांचा समावेश होतो. ज्या ठिकाणी ही सहकार चळवळ उत्तम प्रकारे रुजली तेथील दरडोई उत्पन्न आशिया खंडात सर्वाधिक ठरले. सयाजीरावांनी ५८ प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करून सर्वंकष आर्थिक विकासासाठी सहकार हा विचार साकार केला. यशवंतरावांचे सहकार धोरण सयाजीरावांच्या सहकारविषयक कार्याची प्रखर आठवण करून देणारे आहे.

## उद्योग

यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे जे काम केले. यातून शेती, उद्योग, सहकार, राजकारण, शिक्षण, साहित्य, संस्कृती अशा विविध क्षेत्रांत महाराष्ट्र देशात क्रमांक एकचे राज्य म्हणून प्रस्थापित झाले. उद्योगाच्या क्षेत्रात यशवंतरावांनी केलेले पायाभूत काम म्हणजे त्यांनी स्थापन केलेली विविध महामंडळे होय. महाराष्ट्र हाउसिंग बोर्ड (१ मे १९६०), महा. राज्य विद्युत मंडळ (२० जून १९६०), महा. राज्य सांस्कृतिक मंडळ (१९ नोव्हे. १९६०), महा. राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ (१९६०), महा. राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ (१९६०) ही ५ मंडळे त्यादृष्टीने विचारात घ्यावी लागतात. तर उद्योग विकासाच्या दृष्टीने महा. राज्य मार्ग परिवहन महामंडळ (१ जुलै ६१), महा. राज्य वित्त महामंडळ (१ एप्रिल ६२), महा. राज्य वखार महामंडळ (१९६२), महा. राज्य लघुउद्योग विकास महामंडळ (ऑक्टो. ६२), महा. राज्य औद्योगिक विकास महामंडळ

(१ ऑगस्ट १९६२), महा. राज्य कृषी महामंडळ (१९६२) ही ६ मंडळे महाराष्ट्राला देशात औद्योगिकदृष्ट्या सर्वात प्रगत राज्य म्हणून ओळख देऊन गेलीत.

एम.आय.डी.सी. (MIDC), एम.एस.एफ.सी. (MSFC) आणि सिकॉमची स्थापना करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. उत्तम प्रशासक असलेले श्री. एन. एम. वागळे यांच्याकडे यशवंतरावांनी सिकॉमची जबाबदारी सोपविली, सिकॉमचे स्थान आजही देशात पहिले आहे. तर एम.आय. डी.सी. चे जाळे तालुका पातळीपर्यंत पोहोचले आहे. विभागीय विकास महामंडळे ही यशवंतरावांचीच कल्पना पुढे देशात सर्वत्र मार्गदर्शक म्हणून स्वीकारली गेली. बाहेरच्या १७९ उद्योगपतींना यशवंरावांनी त्यांचे उद्योग महाराष्ट्रात आणण्यास प्रोत्साहित केले. जमशेदपूरचे टेल्कोचे युनिट पिंपरीला आले हे त्याचेच उदाहरण. राज्यातील त्यावेळचे गरवारे, वैद्य, शिर्के, गोगटे, कल्याणी आदी छोट्या उद्योगपतींना पाठिंबा देऊन दुहेरी कारखानदारी उभारून नवे उद्योजक तयार केले.

यशवंतरावांचे उद्योग क्षेत्रातील हे काम विचारात घेता सयाजीरावांनी बडोद्यात निर्माण केलेल्या उद्योगधंद्यांच्या अफाट कामाची पार्श्वभूमी या कामाला होती असे म्हणता येईल. सयाजीरावांनी रेल्वे, रस्ते, धरणे, वीज निर्मिती या पायाभूत सुविधांचा विकास करून बडोद्यात ३० प्रकारचे उद्योग उभारले होते. ते पुढीलप्रमाणे १) महाराणी उलन मिल २) डायमंड

ज्युबिली कॉटन मिल ३) बडोदा डेअरी ४) अश्विनी इंडस्ट्रीज ५) सयाजी मेटल वर्क्स ६) टाटा केमिकल्स ७) अलेम्बिक केमिकल वर्क्स ८) साराभाई केमिकल वर्क्स ९) अलेम्बिक ग्लास फॅक्टरी १०) सिमेंट फॅक्टरी, द्वारका ११) फर्निचर कारखाना १२) गणदेवी साखर कारखाना १३) ओखा साल्ट वर्क्स १४) कलोल स्पिनिंग अॅण्ड व्हिविंग मिल १५) बडोदा कॉटन स्पिनिंग अॅण्ड व्हिविंग मिल १६) मायनिंग इंडस्ट्री १७) लेदर इंडस्ट्री १८) पोल्ट्री १९) विट कारखाना २०) डिंक उद्योग २१) फ्लोअर मिल २२) काडेपेटी कारखाना २३) चायना क्ले २४) ऑइल इंडस्ट्री २५) साबण इंडस्ट्री २६) मत्स्य उद्योग २७) ग्लास इंडस्ट्री २८) सर्जिकल इन्स्ट्रुमेंट इंडस्ट्री २९) स्मॉल स्केल इंडस्ट्री ३०) बडोदा बोल्ट अॅण्ड इंजिनिअरिंग वर्क्स.

सयाजीरावांनी स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी ३०-४० वर्षे बडोद्यात उद्योगाचे भारतीय मॉडेल विकसित केले होते. त्यामुळेच बडोदा ब्रिटिश भारतातील सर्वाधिक विकसित राज्य होते. सयाजीरावांच्या नंतर यशवंतरावांमुळे महाराष्ट्राला स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वात प्रगत राज्याचा दर्जा मिळाला.

## सत्तेचे विकेंद्रीकरण

सयाजीरावांनी १९०२ साली ग्रामपंचायतीचा कायदा केला. या कायद्यानुसार ग्रामपंचायतीमध्ये ९ ते १२ सभासद होते. यापैकी २ ते ३ सभासद हे गावातील लोक निवडत व प्रत्येक ३ वर्षांनी

निवडणूक होत असे. ग्रामपंचायतीचा उमेदवार किमान साक्षर असावा अशी तरतूद या कायद्यात होती. या कायद्याद्वारे 'गाव तिथे ग्रामपंचायत' सुरू करून महाराजांनी सत्तेचे विकेंद्रीकरण केले. स्वातंत्र्यपूर्व काळात हा कायदा करून लोकशाहीची पायाभरणी करण्याचे काम महाराजांनी केले.

१९०२ मध्येच म्हैसूर संस्थानने 'म्हैसूर लोकल बोर्ड ॲक्ट' पास केला. परंतु यामध्ये तालुका, जिल्हा आणि संस्थानचे कायदे मंडळ याच स्तरांचा समावेश होता. त्यामुळे लोकप्रतिनिधींद्वारे गावाचा कारभार पाहणारी ग्रामपंचायत निर्माण करणारा बडोद्याचा कायदा हा भारतातील पहिला कायदा ठरतो. या कायद्यानुसार १,००० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत तर १,००० पेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या गावांसाठी गटग्रामपंचायत स्थापन करण्याची तरतूद या कायद्यात होती. म्हणूनच 'सत्तेचे विकेंद्रीकरण करून राज्यप्रशासन यंत्रणेत तालुका पंचायती व जिल्हा पंचायतींच्यामार्फत लोकशाहीचा आशय आणण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला.' या शरद पवारांच्या विधानाचा महाराष्ट्राने पुनर्विचार करणे गरजेचे आहे.

यशवंतरावांनी महाराष्ट्रात स्थापन केलेल्या पंचायतराज व्यवस्थेची 'बीजे' आपल्याला सयाजीरावांनी ६० वर्षे आधी लागू केलेल्या १९०२ च्या ग्रामपंचायत कायद्यात सापडतात. यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना २० जून १९६० रोजी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या

लोकशाही विकेंद्रीकरण समितीने ३१ मार्च १९६१ रोजी आपला अहवाल सरकारला सादर केला. या समितीच्या शिफारशी स्वीकारत १९६१ मध्येच महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम' कायदा संमत केला. १९६२ मध्ये जिल्हा परिषदांच्या निवडणुका होऊन १५ ऑगस्ट १९६२ पासून त्यांचा कारभार सुरू झाला.

## शिक्षण

संस्थानातील जनतेला विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देणे, विद्यमान उद्योगांचा विकास व नवीन उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी १८९० मध्ये कलाभवनची स्थापना केली. १ ऑगस्ट १९१६ मध्ये महाराजांनी बडोदा कॉलेजमध्ये तत्त्वज्ञान आणि तुलनात्मक धर्म अभ्यासाचे अध्यासन सुरू केले. अशा प्रकारचे जगातील हे बहुधा पहिले अध्यासन असावे. १९१८ मध्ये 'गायकवाड स्टडीज इन रिलिजन ॲण्ड फिलॉसॉफी' या ग्रंथमालेचा प्रारंभ करण्यात आला. जगाच्या इतिहासातील अशा प्रकारची ही आजवरची एकमेव ग्रंथमाला आहे. या संदर्भातील शरद पवार यांचे चिंतन महत्त्वाचे आहे. शरद पवार म्हणतात, 'प्राचीन भारतातील विचारांचा व संस्कृतीचा अर्वाचीन युगधर्माशी त्यांना योग्य मेळ घालता आला हाच राज्यकर्ते या नात्याने त्यांचा अपूर्व गुण होय.'

आपल्या ५८ वर्षांच्या कारकिर्दीत सयाजीरावांनी १,८०० हून अधिक ग्रंथ प्रकाशित केले. १८७० मध्ये दा.य. यंदे यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या ‘ग्रंथ संपादक व ग्रंथ प्रकाशक मंडळी’च्या माध्यमातून ज्ञान चळवळ सहकारी तत्त्वावर राबविली जावी यासाठी १९२५ मध्ये सयाजीरावांनी यंदेंशी चर्चा करून तिला सहकारी संस्थेचे स्वरूप दिले. बडोदा संस्थानाकडून होणाऱ्या ग्रंथ प्रकाशनाच्या व वितरणाच्या कामाला अधिक गतिमान करण्याचा उद्देश यापाठीमागे होता.

महाराजांनी आपल्या कारकिर्दीत केलेल्या ज्ञानप्रसारासाठीच्या प्रयत्नांचा प्रभाव यशवंतरावांच्या शिक्षणविषयक धोरणावर पडल्याचे दिसते. यशवंतरावांच्या प्रेरणेने २३ ऑगस्ट १९५८ रोजी स्थापन झालेले मराठवाडा विद्यापीठ आणि १८ नोव्हेंबर १९६२ रोजी स्थापन झालेले कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ या प्रभावाची साक्ष देते.

सयाजीरावांनी सक्तीचे आणि मोफत शिक्षण हे धोरण १८८२ ला भारतात सर्वप्रथम राबवले. त्याचप्रमाणे शालेय शिक्षणापासून ते परदेश शिक्षणापर्यंत शेकडो शिष्यवृत्त्या देऊन या धोरणाचा विस्तार केला. यशवंतराव चव्हाणांनी १,२०० पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील सर्वांना प्राथमिक ते विद्यापीठ शिक्षण मोफत देणारे ई.बी.सी. धोरण मुख्यमंत्री

झाल्यानंतर लगेचच अमलात आणले. सयाजीरावांनी त्यांच्या बडोदा कॉलेजमध्ये एन.सी.सी. चे शिक्षण अनिवार्य केले होते. असाच निर्णय यशवंतरावांनी १९६३ मध्ये संरक्षणमंत्री झाल्यानंतर घेतला.

सयाजीराव महाराजांनी सहकार चळवळीला दिलेले योगदान सहकारात देशाला मार्गदर्शन करणाऱ्या महाराष्ट्रालासुद्धा समजून घ्यावे लागेल इतके अफाट आहे. सयाजीरावांचा सहकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत मूलभूत होता. २८ मार्च १९३० रोजी सयाजीरावांनी केलेल्या भाषणात व्यक्त केलेले 'सहकार चिंतन' याची प्रचीती देते. महाराज म्हणतात, 'मानवजातीच्या संस्कृतीचा इतिहास म्हणजे स्थूलमानाने सहकाराच्या विकासाचाच इतिहास आहे.'

## सहकार

आय.सी.एस. अधिकारी फ्रेड्रिक निकोलस व सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांच्या अहवालानंतर १९०४ मध्ये ब्रिटिश सरकारने भारतात सहकार कायदा लागू केला. ब्रिटिश भारतात सहकार कायदा लागू झाल्याच्या दुसऱ्याच वर्षी १९०५ मध्ये सयाजीरावांनी बडोदा संस्थानात सहकार कायदा लागू केला. बडोद्यात सहकार कायदा १९०५ मध्ये लागू झाला असला तरी त्याच्या १७ वर्षे आधी १८८९ मध्ये प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'अनोन्य सहकारी मंडळी' या सहकारी तत्त्वावरील संस्थेची स्थापना करण्यात

आली होती. आज सुद्धा ही संस्था अस्तित्वात असून तिचे अर्बन बँकेत रूपांतर झालेले आहे. प्रा. कवठेकर यांनी १८९७ मध्ये अर्थशास्त्राची मूलतत्त्वे मराठीत मांडण्याचा पहिला प्रयत्न 'अर्थशास्त्र' या ग्रंथाद्वारे केला. २० फेब्रुवारी १९१४ रोजी बडोदा येथे भारतातील बहुधा पहिली सहकार परिषद झाली होती. सयाजीरावांच्या कारकिर्दीत बडोद्यात एकूण ५८ प्रकारच्या सहकारी संस्था सक्षमपणे कार्यरत होत्या.

शेतीसाठी कर्जपुरवठा, उत्पादित शेतमालाची विक्री, शेती विकास, शेती मालावर प्रक्रिया, दुग्ध उत्पादन, कुक्कुटपालन इ. शी संबंधित सहकारी संस्थांना यशवंतरावांनी भक्कम पाठबळ दिले. सहकारी बँक, भूविकास बँकांच्या माध्यमातून या सहकारी संस्थांना कर्ज पुरवठ्याची सोय उपलब्ध करून दिली. यशवंतरावांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत एकाच वेळी १८ सहकारी साखर कारखान्यांची नोंदणी करून सहकार चळवळीत प्रस्थापित केलेला विक्रम आपण जाणतोच. परंतु यशवंतरावांच्या या निर्णयाच्या सुमारे ७४ वर्षे आधी सयाजीरावांनी गणदेवी येथे स्थापन केलेला आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना दुर्दैवाने महाराष्ट्राला माहीत नाही.

१९६९ मध्ये नागपूर येथे महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळाची स्थापना करण्यात आली. अभियांत्रिकी, विज्ञान, कृषी, वैद्यक या व्यावसायिक अभ्यासक्रमांची मराठी भाषेतील

पुस्तके प्रसिद्ध करण्याचा उद्देश या मंडळाच्या स्थापनेमागे होता. आपल्याला या संस्थेच्या स्थापनेची ‘मुळे’ तिच्या स्थापनेआधी ७९ वर्षे बडोद्यात सयाजीरावांनी सुरू केलेल्या ‘कलाभवन’मध्ये आढळतात.

१८९० मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात स्थापन केलेली कलाभवन ही विविध प्रकारचे तांत्रिक शिक्षण देणारी तत्कालीन भारतातील एक उत्तम पॉलिटेक्निक संस्था होती. कलाभवनमधील सर्व शिक्षण देशी म्हणजेच गुजराती भाषेमध्ये उपलब्ध होते. इंग्रजी भाषेतील शिक्षण सक्तीमुळे संस्थानातील हुशार कारागीर त्यांच्या व्यवसायाच्या तांत्रिक ज्ञानापासून दूर राहू नयेत यासाठी शिक्षण घेत असताना ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांना गुजराती भाषा अडचणीची वाटेल अशा वेळी शिक्षक हिंदी, मराठी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करत.

१९६७ मध्ये महाराष्ट्र सरकारने ‘महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम’ संमत केल्यानंतर महाराष्ट्रातील ‘गाव तेथे ग्रंथालय’ चळवळीला खऱ्या अर्थाने गती मिळाली. या कायद्याच्या ५७ वर्षे आधी १९१० पासून सयाजीरावांनी डॉ. बॉर्डन या जगप्रसिद्ध अमेरिकन ग्रंथालयशास्त्र तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली बडोद्यात आजच्या भारतालाही आदर्शवत ठरेल अशी ग्रंथालय चळवळ उभा केली होती. १९११ मध्ये स्वतःच्या खासगी लायब्ररीतील २०,००० ग्रंथ भेट देत तत्कालीन आशियातील सर्वात मोठी सेन्ट्रल लायब्ररी सयाजीरावांनी बडोद्यात उभी केली. महिलांना

घरपोच पुस्तके मिळावीत म्हणून पत्र्याच्या पेटीतील ग्रंथालय, फिरते ग्रंथालय, गाव तेथे ग्रंथालय, ग्रंथालय चळवळीवरील नियतकालिक असे अलौकिक काम महाराजांनी उभे केले. यशवंतरावांचे ग्रंथप्रेम आणि वाचन याची सयाजीरावांशी तुलना करता यशवंतराव सयाजीरावांचा 'पाठलाग' करत होते असे म्हणता येईल.

ग्रामीण औद्योगिकीकरणाबाबत यशवंतराव म्हणतात, 'ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योगांची सांगड घातली जावी. शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेची सांगड घालून शहरांकडे धाव घेणारा श्रमिकांचा लोंढा थोपविता येईल.' अविकसित भागात विकासासाठी त्यांनी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना मांडली. ग्रामीण लोकांमध्ये उद्योगधंद्याबाबतची माहिती पोहोचविणे, नव्या तंत्रज्ञानाबद्दल त्यांच्या मनात आकर्षण निर्माण करणे आणि उद्योगधंद्यांविषयी लोकांमध्ये लोकप्रियता निर्माण करण्याच्या उद्देशाने डिसेंबर १८८१ मध्ये सयाजीराव महाराजांनी कृषी आणि औद्योगिक प्रदर्शनाचे आयोजन केले. १९०६ मध्ये पारंपरिक ग्रामीण कारागिरांना त्यांच्या व्यवसायाचे प्रगत शिक्षण देण्यासाठी सयाजीरावांनी रात्रीच्या तांत्रिक शाळा सुरू केल्या.

कर्जबाजारी व उच्च व्याजदराने शोषित ग्रामीण जनतेला दिलासा देण्यासाठी महाराजांनी कृषी बँकांची स्थापना केली. १९३६ मध्ये स्थापन केलेल्या हीरकमहोत्सवी कुटीरोउद्योग

संस्थेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील बेरोजगार व कारागिरांच्या मुलांना विविध छोट्या व मोठ्या उद्योगांमधील प्रक्रियांच्या सुधारित पद्धतीचे प्रशिक्षण देणे हा होता. म्हणूनच शरद पवार म्हणतात, 'सयाजीरावांनी शेतीबरोबर शेतीपूरक उद्योग निर्माण करून भारतात सर्वप्रथम कृषी-औद्योगिक प्रक्रियेचा पाया रचला. ...अशा या थोर रयत सेवकाचे विचार आजचा आधुनिक समाज घडविताना आपल्याला अमलात आणावेच लागतील.'

## साहित्य आणि संस्कृती

१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर सयाजीरावांचा वारसा कृतीत आणणाऱ्या यशवंतराव चव्हाणांनी घेतलेला पहिला निर्णय म्हणजे १९ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची केलेली स्थापना होय. अशा प्रकारची संस्था स्थापन करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य होते. हे मंडळ म्हणजे महाराजांनी बडोद्यात मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी केलेल्या विविध प्रयत्नांचे एकत्रीकरण होते. यशवंतरावांनी साहित्यिक, कलाकार, गायक, तमासगीर, कुस्तीवीर, शाहीर यांना राजाश्रय दिला.

त्यांना पेन्शन सुरू केल्या. याअगोदर एक धोरण म्हणून असे काम सयाजीरावांनी बडोद्यात फार मोठ्या प्रमाणावर केले होते. विशेष म्हणजे यशवंतरावांनी या मंडळातर्फे १९६२ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या समग्र साहित्याचे

प्रकाशन महाराष्ट्र शासनाने करावे असा निर्णय घेतला. हा निर्णय यशवंतराव स्वयंस्फूर्तपणे घेतात. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, ते नव्या महाराष्ट्रासमोर आपला गौरवशाली वारसा नव्याने प्रस्थापित करू इच्छितात.

या निर्णयाची पार्श्वभूमी म्हणजे १९६३ हे सयाजीरावांचे जन्मशताब्दी वर्ष होते. परंतु १९६२ ला भारत-चीन युद्ध सुरू झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण केंद्रात संरक्षणमंत्री म्हणून गेले आणि हे काम मागे पडले. पुढे १९७६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि १९९० ला महात्मा फुले व शाहू महाराज यांची चरित्र साधने प्रकाशनाचे काम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले. दरम्यान १ डिसेंबर १९८० रोजी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना करण्यात आली. यशवंतरावांनी १९६२ ला घेतलेला निर्णय पुढे ५४ वर्षांनी २०१६ मध्ये प्रत्यक्षात कार्यान्वित झाला. परंतु १९६२ च्या यशवंतरावांच्या या निर्णयाची खबरबात आजअखेर महाराष्ट्राला नाही. २०१६ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती' स्थापन केली. हा निर्णय होण्यामागे बाबा भांड यांचे १० वर्षांचे सयाजीशोधाचे काम कारणीभूत होते. २०१६ ते २०२० या ४ वर्षांत मा. बाबा भांड यांनी या समितीचे सचिव म्हणून जबाबदारी पार पाडत असताना समितीतर्फे एकूण ६२ ग्रंथांची निर्मिती केली.

## समाजकल्याण

यशवंतराव चव्हाणांनी मुख्यमंत्री म्हणून घेतलेल्या अनेक क्रांतिकारक निर्णयांपैकी महत्त्वाचा निर्णय म्हणजे समाजकल्याण या स्वतंत्र खात्याची निर्मिती. असे खाते निर्माण करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य होते. हे खाते मुख्यतः अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी निर्माण केले होते. याबरोबरच १९५६ च्या धर्मांतरानंतर नवबौद्धांच्या बंद झालेल्या सवलती सुरू करणे, आंबेडकर जयंतीची सुटी, दीक्षाभूमीची मागणी पूर्ण करणे या सारखे धोरणात्मक निर्णय यशवंतरावांनी घेतले. यशवंतरावांचे हे सर्व काम सयाजीरावांचा वारसा जपणारे आहे. कारण सयाजीरावांनी भारतात सर्वप्रथम अस्पृश्य, आदिवासी, महिला यांच्या कल्याणाचे धोरण राबवले होते.

यशवंतराव चव्हाण मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर गुलामी पद्धतीची महार वतन पद्धती नष्ट करणारा 'Bombay Inferior village watan's Abolitions Act, 1958' हा कायदा त्यांनी करून पूर्वाश्रमीच्या महार समाजाला वतनी गुलामगिरीच्या दावणींतून मुक्त केले व त्याबरोबर 'वतन जमिनी' पूर्ण शेतपट्टीच्या तिप्पट किंमत देऊन वहिवाटीदार मालकांना मालकी हक्काने परत ताब्यात दिल्या. यशवंतरावांच्या सर्वसमावेशकतेचे उत्तम उदाहरण येथे देता येईल. कारण ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधीजींच्या खुनानंतर झालेल्या दंगलीत ज्यांचे आर्थिक नुकसान झाले होते, त्यांना मदत

म्हणून सरकारने जी कर्जे दिली होती ती यशवंतरावांनी माफ करून टाकली. महार आणि ब्राह्मण यांना तितक्याच समानतेने वागणूक देणारे यशवंतराव थेट सयाजीरावांशी नाते जोडतात. कारण सयाजीरावांनी ज्या जातीला जितकी मदतीची गरज आहे तितकी देण्याची भूमिका त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत घेतली. त्यामुळेच कोणतीही एक जात सयाजीरावांवर दावा सांगू शकत नाही. नेमके यशवंतरावांबाबतही हेच दिसते, कारण यशवंतरावांच्या कारकिर्दीत कोणत्याही एका जातीला जास्त झुकते माप मिळाल्याचे उदाहरण सापडत नाही.

यशवंतराव हे खऱ्या अर्थाने 'डीकास्ट' झालेले नेते होते. याची दोन उत्तम उदाहरणे सांगता येतील. जातिनिरपेक्षता हे यशवंतरावांचे जीवन तत्त्वज्ञान होते. अगदी लहानपणापासूनच हरिजनांसाठी काहीतरी करण्याची जिद्द यशवंतरावांची होती. १९३० साली मॅट्रिकला असताना त्यांनी हरिजनांसाठी कराडच्या महार वस्तीमध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांच्या हस्ते शाळा सुरू केली. या दिवशी हरिजन मुलांची जेवणाची पंगत यशवंतरावांच्या घरी पार पडली. दुसरे उदाहरण महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते कोल्हापुरात राहिले होते. त्याविषयी यशवंतराव सांगतात, 'राहण्यासाठी वसतिगृह निश्चित करताना मी दहा वेळा विचार केला. परंतु जातीय नावावर चालणाऱ्या वसतिगृहात शिक्षणासाठी राहायचे काय, असा सवाल माझ्यासमोर निर्माण झाला आणि अखेरीस अशा वसतिगृहात राहायचे माझ्या मनाने

नाकारले. जिथे कुठे लहान खोली मिळाली, तिथे राहिलो आणि शिक्षण घेतले. योगायोग असा की, त्या लहान खोलीत मला जोडीदार मिळाला, तोही एक माझा ब्राम्हण मित्र होता.'

सयाजीराव लहानपणी कवळाण्यात सर्व जातीच्या मित्रांमध्ये अतिशय मनापासून रमत. पुढे १८७५ ला राजा झाल्यानंतर १८७७ मध्ये वयाच्या १४ वर्षी त्यांनी अहमदाबाद येथे ठरवून अस्पृश्यांसह सहभोजन केले. तर राज्याधिकार प्राप्तीनंतर १८८२ ला वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी अस्पृश्य-आदिवासींना मोफत शिक्षण व निवासाची सोय केली. पुढे अस्पृश्योद्धाराचे भारतातील सर्वात क्रांतिकारक कार्य सयाजीरावांनीच उभे केले.

## शिवरायांचा वारसा

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्र 'प्रतिशिवाजी' म्हणतो. परंतु शिवाजी महाराजांचे विचार आणि धोरण बडोदामार्गे यशवंतरावांपर्यंत पोहोचले होते. आजवर या दृष्टीने लेखन, चिंतन आणि संशोधन न झाल्यामुळे महाराष्ट्र याबाबत 'अनभिज्ञ' आहे. या संदर्भात शरद पवार म्हणतात, 'या देशात अनेक राजे निर्माण झाले, परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला राज्यकारभार चालवितांना सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवला म्हणून ते अजरामर झाले. त्यानंतर खऱ्या अर्थाने त्यांचा वारसा श्रीमंत सयाजीराव महाराजांनी चालविला.' जसे शिवाजी महाराजांचे प्रतिबिंब सयाजीरावांमध्ये स्पष्टपणे दिसते तसेच सयाजीरावांचे प्रतिबिंब यशवंतरावांच्या सर्व

विचार आणि धोरणांमध्ये पावलोपावली आढळते. मग ते सत्तेचे विकेंद्रीकरण असो, कसेल त्याची जमीन असो, मोफत शिक्षणाचे धोरण असो, गाव तेथे ग्रंथालय, साहित्य आणि संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती किंवा धर्मविषयक धोरण आणि कृती या सर्व बाबी यशवंतरावांकडे सयाजीरावांकडून आल्या होत्या असे म्हणण्यासाठी भक्कम आधार उपलब्ध आहेत.

१४ एप्रिल १९३३ रोजी सातारा म्युनिसिपालिटीच्या मानपत्रास उत्तर देताना केलेल्या भाषणात सयाजीराव म्हणतात, 'सातारचा व आमचा संबंध नवा नाही, तो जुनाच आहे. राजकीय संबंधाप्रमाणेच आमचे शारीरिक संबंध झाले आहेत, असे इतिहासावरून तुम्हांस आढळून येईल. या इतिहासाचा पोकळ अभिमान धरण्यात हशील नाही. त्याचे निःपक्षपातीबुद्धीने निरीक्षण करून त्यापासून जरूर तो बोध आपण घेतला पाहिजे. शिवाजीमहाराजांचा सन १६६० ते ६५ च्या सुमारास राज्याभिषेक सोहळा झाला. तारखेत कदाचित चूक असेल, कारण मी अंदाजाने बोलत आहे, व सन १८१८ त पेशवाईबरोबर मराठ्यांचे राज्य बुडाले, म्हणजे मराठी राष्ट्र अवघे १५०-२०० वर्षेच टिकले.

हा काळ इतिहासांत किती अल्प आहे? मनुष्याप्रमाणे राष्ट्रालाही कार्य करण्यांस इतिहासात 'काल आणि स्थल' (Time and Space) यांची जरुरी असते. या दोन्ही गोष्टी दुर्दैवेकरून मराठी राज्यास मिळाल्या नाहीत. ज्या राष्ट्राला आपले सामर्थ्य व सत्ता १५०-२०० वर्षेही नीट टिकविता आली

नाही, त्यास जगाच्या इतिहासांत राष्ट्र म्हणून कोणते स्थान मिळेल? मराठी सत्तेचे स्मारक म्हणून आज एकतरी चांगली इमारत किंवा राज्यपद्धतीचे एखादे वैशिष्ट्य आपणांस दाखविता येण्यासारखे आहे काय? तेव्हा असल्या अल्पजीवी राष्ट्राबद्दल पोकळ अभिमान धरण्यापेक्षा ते इतक्या लवकर व थोड्या काळांत का नाहीसे झाले याचा विचार तुम्हांस उपयोगी होईल.'

सयाजीराव महाराजांनी ८८ वर्षांपूर्वी उपस्थित केलेला हा गंभीर प्रश्न आजच्या परिस्थितीत महाराष्ट्राचा पुरोगामी वारसा मृत होण्याच्या पार्श्वभूमीवर पुन्हा उपस्थित होतो. तो प्रश्न असा की, 'अवघ्या साठ वर्षांत महाराष्ट्राचे पुरोगामी धोरण पराभूत का झाले?' या प्रश्नाचे उत्तर सयाजीरावांच्या प्रश्नाच्या नेमके उलटे येते हे विशेष. पेशवाईतील ब्राह्मणशाहीने शिवाजी महाराजांचे साम्राज्य नष्ट केले. तर महाराष्ट्राचे पुरोगामित्व बहुजनांच्या जातकेंद्री सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय धोरणाने पराभूत केले. ब्राह्मणांसह बहुजन जातींमधील संवादी नात्याच्या सकारात्मक प्रबोधनातूनच या प्रश्नाचे उत्तर सापडण्याची शक्यता आहे आणि नेमके याच ठिकाणी सयाजीराव 'संवाददूत' म्हणून सर्वाधिक उपयुक्त ठरतात. यातच 'सयाजीचिंतना'ची महाराष्ट्राला किती गरज आहे याचा उलघडा होतो.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवी असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



❒ **महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि.,११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com